# प्रकरण दुसरे

## साहित्यिक - वि. शं. पारगावकर

# प्रकरण दुसरे

## साहित्यिक - वि. शं. पारगांवकर

वि. शं. पारगावकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा व लेखनाचा परिचय करुन घेणे श्रेयस्कर ठरेल. प्रस्तुत प्रकरणात त्याचाच विचार करावयाचा आहे.

आपले साहित्य लिहीत असताना लोकांच्या अनेक अडचणी, त्यांचे आचार-विचार, राहणीमान, दर्जा, परिस्थिती, सामान्य लोकांचे जीवन हे सर्व त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे त्यांचे साहित्य सुरुवातीपासून सामान्य लोकांचे जीवनानुभव मांडणारे वाटते. त्यांचे एकूण साहित्य जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करुन त्यातील भावसत्य शोधत राहते. कथा, कादंबरी, राजकीय लेखनपर ग्रंथ, ललित कथासंग्रह, आस्वाद आणि समीक्षा असे ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. कादंबरी या प्रमुख वाड्.मयप्रकाराव्दारे श्री. पारगांवकर यांनी उपरोक्त जीवन आणि त्यातील भाव-भावना कशा चित्रित केल्या आहेत , याचा आशय व अभिव्यक्ती या दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते. म्हणून 'अपरंपार' व 'अयोनिजा' या दोन कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत.

श्री .वि. शं. पारगावकर यांनी इ. स. १९५३ पासून खऱ्या अर्थाने लेखनास सुरुवात केली. कथा आणि कादंबरी अशा कथात्मक साहित्याच्या दोन्ही माध्यमांतून

त्यांनी लेखन केले. 'चापूची वहिनी' ही त्यांची पहिली १९५३ साली 'सत्यकथा'तून प्रसिध्द झालेली कथा आहे.

श्री पारगांवकर यांचा जन्म मराठवाडयातील बीड येथे १४ नोव्हेंबर १९२६ रोजी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे सारे बालपण निजामी राजवटीत गेले. बीड जिल्हा आणि त्यांच्या परिसरातील पारगाव, पिंपळगाव, पाटोदा, राजुरी, या ग्रामीण परिसरात त्यांचे बालपण गेले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण उर्दू माध्यमातून झाले. त्यांच्या भोवताली ग्रामीण व गरिबीचे वातावरण होते. घरातील गरिबीमुळे स्वतःचे नशीब आजमावण्यासाठी १९४७ साली ते पुण्यात आले. १९४८ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयातील ग्रंथालयात नोकरीवर रूजू झाले. १९५७ पासून फर्ग्युसन कॉलेज कार्यालयामध्ये त्यांना बढती मिळाली. १९६९ पासून जिमखाना विभागात ते काम पाहू लागले. तर १९७७ पासून AOS या पदावर काम करु लागले. १९७५ पासून फर्ग्युसन कॉलेज स्टाफ क्वार्टर्समध्ये मोठया घराचे सुख त्यांना लाभले.

श्री. पारगांवकर यांचे कुटुंब हे मूळचे हैद्राबादचे. 'पारगांवकर' हे निजामशाहीतील एक प्रतिष्ठित घराणे होते. पण खुद्द वि. शं. पारगांवकरांचे वडील नोकरीनिमित्त मराठवाडयातील बीड या जिल्ह्याच्या ठिकाणी आले. जवळच्याच पारगावचे कुलकर्णीपणही ते सांभाळीत होते. त्यामुळे पुण्याला येईपर्यंत वीस बावीस वर्षापर्यंतचे पारगांवकरांचे पूर्वायुष्य हे बीड जिल्हा आणि त्या परिसरातील अनेक गावात गेले. निजामशाहीतील बीड जिल्हा अत्यंत मागासलेला

होता. पारगांवकरांचे शालेय शिक्षणही उर्दू भाषेच्या माध्यमातून झाले. ब्राम्हणाच्या मुलाने शिकलेच पाहिजे एवढाच एक पुसट संस्कार शिक्षणाच्या संदर्भात होता. पारगावकर हे सहावी पास झाल्यानंतर पुढील शिक्षण बंद करावे आणि छोटीशी नोकरी करावी, असा त्यांच्या वडिलांचा मानस होता. पण सुदैवाने त्यांचे शिक्षण सुटले नाही, आणि दैवयोगाने त्यांना पुढील शिक्षण लाभले.

पारगांवकर हे सामान्य कुटुंबात जन्मलेले असल्याने त्यांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागले. त्यातच त्यांचे शिक्षण अत्यंत अल्प आणि तेही उर्दू माध्यमातून झालेले होते. मनामध्ये लेखक होण्याची एकमेव ईर्ष्या होती. पण घरातील गरिबीमुळे त्यांना अनेक अडथळे येवू लागले. पण त्यांची महत्वाकांक्षा कधीही कमी झाली नाही. आपण लेखक व्हायचेच हा त्यांचा अट्टाहास होता.

वि. शं. पारगांवकर इयत्ता ९ वी पास झाल्यानंतर काही दिवसातच त्यांची आई देवाघरी गेली. आई होती तो पर्यंत पारगांवकरांनी कशाचीही काळजी केली नाही. अगदी मोकळेपणाने ते शिकत होते. गरिबी ही त्यांना जाणवलीच नाही. आईचे कृपाछत्र असल्यामुळे ते आनंदी होते. कोणतेही दडपण त्यांच्या मनावर नव्हते. पण आईच्या निधनानंतर ते सर्वस्वी पोरके झाले. वडील असून सुध्दा ते एकाकी पडले. आई होती तोपर्यंत घर बरंच एकत्रित होतं. ती गेल्यावर सर्वांचाच तोल सुटल्यासारखा झाला. मायेचं माणूस घरात असं कोणीच राहिलं नाही. घर आर्थिक ओढाताणीमध्ये सापडलं. थोरल्या भावाचा पगारही जेमतेमच , वडिलांची

पेन्शन तुटपुंजी , आणि त्यातच धाकटयाभावाचे शिक्षण या सर्व अडचणींमुळे पारगांवकरांना पुढील शिक्षण घेणे अत्यंत कठीण झाले.

आईच्या मृत्यूनंतर एका वर्षातच पारगांवकर व त्यांचे वडील बीड मधील काकांच्याकडे आले. काही दिवसातच वि. शं पारगांवकरांचे लग्न काकांनी व वडिलांनी ठरविले. अशा रीतीने धड शिक्षण नाही, नि धड नोकरी नाही. त्यातच लग्न झाले होते. काय करावे नि काय करू नये अशी द्विधा मनःस्थिती पारगांवकरांची झाली होती. अशावेळी त्यांनी निर्णय घेतला. पत्नीला माहेरी पाठविले. काकांच्याकडून थोडे पैसे घेवून त्यांनी आहे त्या कपडयानिशी पुणे गाठले.

पारगांवकर पुण्यामध्ये आल्यानंतर त्यांनी प्रथम काही काळ 'डिफेन्स अकाउंट्स ' मध्ये नोकरी केली . नंतर ते १९४७ मध्ये फर्ग्युसन महाविदयालयातील वाडिया ग्रंथालयात नव्या नोकरीवर रुजू झाले. १९७६ पासून त्याच कॉलेजमध्ये मुख्य कार्यालयात एक जबाबदार व्यक्ती म्हणून काम पाहू लागले.

फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रंथालयात त्यांनी २०-२५ वर्षे सेवा केली. त्यांचा पिंड ग्रामीण जीवनावर पोसलेला होता. त्यामुळे पुण्यात आल्यानंतर त्यांनी आपले जीवन बदलून टाकले. ते पुण्यातील साहित्यिक वातावरणात रमले. सतत ग्रंथांचा सहवास आल्यामुळे व संदर्भ , संशोधन , ग्रंथांची आवड असल्याने त्यांचे वाचन, चिंतन, मनन सुरू झाले. व त्यातूनच सुप्त असलेली लेखनाची ओढ जागृत झाली. त्यांच्या लेखनाला दिशा सापडली.

एकूणच त्यांना आपल्या कलावंतपणाचा तोरा होता. तो त्यांनी जन्मभर मिरवला. पारगांवकर हे मूळचे देशस्थ ब्राम्हण होते. त्यामुळे लहानपणी घरामध्ये उदंड कुळाचार, कर्मकांड; पण स्वतःच्या घरातून त्यांनी या सर्व गोष्टींना कायमचेच हद्दपार केले होते. ठरलेली वेळ पाळणे, पैशाच्या व्यवहारात चोख असणे, वागणुकीतला काटेकोरपणा, संयमी व प्रेमळ आचरण, या त्यांच्या सर्वच गोष्टी त्यांच्याच कल्पनेतील आदर्श कोकणस्थासारख्या होत्या. या सर्व गोष्टी त्यांनी आपल्या वडिलोपासून घेतल्या होत्या.

मराठवाडयाला संतकवितेची भूमी असे म्हटले जाते. तशीच कथेलाही जन्म देणारी ही भूमी आहे. याच भूमीमध्ये अनेक कीर्तनकारांनी आपल्या मधुर वाणीने समाजप्रबोधन केले. या भूमीमध्ये बी. रघुनाथ, रा. रं. बोराडे यांच्यासारखे मातब्बर कथाकार निर्माण झाले . याच मातीत पारगांवकर घडले.

वि. शं. पारगांवकर यांनी मॅट्रिकची परीक्षा हैद्राबादहून पास झाल्यानंतर 'सय ' सारख्या ललित लेखनातून बालपणाचे त्यांचे मराठवाडयातील जीवन चित्रित केले आहे. यामध्ये त्यांनी गावाचे, व्यक्तींचे, निसर्गाचे संवेदनशीलतेने चित्रण केले आहे. या लेखनाला 'नोस्टल्जिया ' चा किंवा ' भावुक काव्यात्मते ' चा स्पर्श झालेला दिसत नाही . वि. शं. पारगांवकरांचा मित्र परिवार फार मोठा होता. पारगांवकरांचे सगळे लेखन त्यांच्या 'पुणेरी ' वास्तव्यातच घडलेले आहे. पण त्यांच्यांतील लेखक ते मराठवाडयात असतानाच रुजला होता. बीड शहरातल्या एका

किराणामालाच्या दुकानाने पारगांवकरांना पुस्तकांच्या जगाकडे खेचले. त्यांच्यावर साहित्याने संस्कार केले, ही गोष्ट विलक्षण आहे. स्वतः पारगांवकर या घटनेचे वर्णन करताना म्हणतात, " -------- किती शब्द ! किती माणसे ! शब्दांमधून डोकावणारी आणि जिवंत होऊन मनाला भिडणारी ! मनात खळबळ उडवून देणारी, तरीही कुठेतरी तृप्ती देणारी, आनंद देणारी !"[१]

ह. ना. आपटे, नाथ माधव, वि. वा. हडप, शरच्चंद्र चटर्जी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर असे कितीतरी लेखक पारगांवकरांना किराणा मालाच्या दुकानातच असलेल्या फुकटच्या ग्रंथालयात वाचायला मिळाले. त्याच पुस्तकांनी त्यांना पूर्णपणे 'ग्रासून ' टाकले. ही काय किमया झाली, हे त्यांचे त्यांनाच कळेना. कारण त्यांचे वय कळण्या न कळण्यासारखे होते. त्यांच्या कोवळया वयातच त्यांना साहित्याने घडविले, म्हणजेच त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली , त्यांच्यातला माणूस जागा झाला. ते म्हणतात, " या घटनेने मला एक नवीनच दृष्टी लाभली. ----- एका नव्याच जगात मी प्रवेश केला----"[२] यावरून स्पष्ट होते की, त्यांच्यातला लेखक मराठवाडयाने घडविला.

प्रसिध्द कथाकार दि. बा. मोकाशी यांच्या उत्तेजनामुळे त्यांनी कथा लेखनास सुरुवात केली. त्यांची पहिली कथा 'बापूची वहिनी ' फेब्रुवारी १९५३ मध्ये ' सत्यकथे 'तून प्रसिध्द झाली. तिचे हिंदी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत भाषांतर झालेले आहे. या कथेपासून अनेक जाणकारांचे त्यांच्याकडे लक्ष वेधले गेले. याच

कथेने त्यांना लेखक म्हणून एकदम प्रसिध्दी मिळाली. तसेच सत्यकथेतून प्रसिध्द झालेल्या त्यांच्या अनेक कथांनी त्यांच्या विषयीच्या अपेक्षा वाढविल्या. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या कथा वि. शं. पारगांवकरांनी सहज लिहिल्या आहेत.

एखादा बंगला उभा करावा तसे ते आपली कथा रचत नाहीत तर जमिनीतून एखादे बीज उगवावे तशी हळुवारपणे त्यांची कथा उमलते. त्यांच्या अनेक कथांतून निसर्ग, सौंदर्य, मानवीदृष्टी इत्यादी घटक बहरलेले दिसतात. म्हणून त्यांची कथा आजही श्रेष्ठ दर्जाची ठरते. तरल भावतृप्ती, उत्कट भावानुभव, अनामिक, आर्त हुरहूर, भावविश्वातील गुंतागुंतीचे चित्रण, मानवी विचार इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या अनेक कथांतून दिसून येतात.

वि. शं. पारगांवकरांच्या अनेक कथा प्रथम पुरुषी एकवचनी आहेत. त्यांनी एका कथेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. " जगात आजपर्यंत मी कशाचेच काही मनावर घेतलं नव्हतं. मला तशी सवयच नव्हती. परिणामकारक हेतू मनात ठेवून माझ्याकडे कोणी येतही नसे. आणि आपण कोणावर काही परिणाम करावा अशा जिद्दीने मला कुणाशी काही बोलण्याचा प्रसंगही आलेला नव्हता. माझे मनच विचित्र पध्दतीने घडवलं गेलं होतं. मनातलं कुणी काही माझ्याशी बोलावे असे माझे व्यक्तीमत्व नव्हतं. कुणाला मी पोरकट वाटत होतो , तर कुणाला रुक्ष वाटत होतो. त्यामुळे कुणी माझ्याजवळ - अतिजवळ येत नव्हतं. आपलं काम आणि कामापुरते माणसांचे येणारे संबंध या पलीकडे माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादाच गेलेल्या नव्हत्या. " [३]

वि. शं. पारगांवकरांच्या अनेक कथांमधून त्यांचे व्यक्तिमत्व स्पष्ट होते. त्यांच्या एकूण कथा अंतर्मुख करावयास लावतात. त्यांची कथा थोड्या शब्दांतून बराच अर्थ स्पष्ट करते. उदा.- 'पंचरंगी स्वप्न ' (१९६०), 'मरवा ' (१९६२), 'केळफूल ' (१९६४), 'चंद्र आणि चिमणी ' (१९६५), 'राणी ' (१९८०), 'आविष्कार ' (निवडक) (१९८५) इत्यादी सहा कथासंग्रह आहेत. आजवर पारगांवकरांच्या शंभरावर कथा दर्जेदार मासिकांतून प्रसिध्द झालेल्या आहेत.

वि. शं. पारगावकरांच्या 'आविष्कार ' (निवडक) (१९८५) कथासंग्रहातून त्यांच्या प्रातिनिधिक २५ कथा आहेत यामध्ये त्यांनी नागरी, ग्रामीण, दलित, जीवनानुभवाच्या कथा अभिव्यक्त केल्या आहेत. या कथासंग्रहाला प्रा. स. शि. भावे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. याच कथासंग्रहातून पारगांवकरांचे नेमके विचार स्पष्ट होतात. या कलाकृतीवर वा. ल. कुलकर्णी, राम पटवर्धन, दि. के. बेडेकर, मु. शं. किर्लोस्कर, गो. म. कुलकर्णी, आनंद यादव, श्री. ग. माजगांवकर, द. भि. कुलकर्णी इत्यादी समीक्षकांनी लेखन केले.

अशा रीतीने पारगांवकरांच्या एकूण कथा विविध मनोवृत्तींच्या, विविध दुःखे जपणाऱ्या, विविध व्यवसायातील अनेक माणसांची मानसिक आंदोलने निर्माण करणाऱ्या विविध स्तरातील व्यक्तींच्या भावस्थितींचे वर्णन करणाऱ्या, शरीर दर्शनापेक्षा भावजीवनाची व्यथा मांडणाऱ्या अशी अनेक वैशिष्टये पारगांवकरांच्या कथेमधून दिसून येतात. मानवी मन लक्षात घेऊन विशिष्ट व्यक्तिरेखा उभी करणे, मनाचे सूक्ष्म

अतिसूक्ष्म पापुद्रे हळुवारपणे उलगडणे ही गोष्ट तशी अत्यंत कठीण, पण पारगांवकर त्यामध्ये यशस्वी झालेले दिसतात.

वि. शं. पारगांवकर यांचे सारे लेखन १९६० ते १९८४ या पंचवीस वर्षाच्या कालावधीत झालेले आहे. त्यांचे कथालेखन व कादंबरीलेखन हे एकाचवेळी चालु होते. त्यांचा कथेपेक्षा कादंबरी लेखनाकडे जास्त ओढा होता. कादंबरी लेखनात कळत-नकळत त्यांनी काही प्रयोगही केले. त्यामध्ये समाधान लाभावे इतपत यश त्यांना मिळाले.

पारगांवकर यांनी १९६२ पासून कादंबरी लेखनास प्रारंभ केला.'ललाट ' (१९६२), ' निगुडा ' (१९६२), ' वैशाखातील चावटळ ' (१९६३)', 'एक होता राजा ' (१९६५), ' कालचक्र ' (१९६७), ' पांढरी माती ' (१९६८), ' ललिता ' (१९६९), ' शेवगा वेडा झाला ' (१९७०), ' अपरंपार ' (१९७०), 'अंतरिता ' (१९७१), 'गोंदण' (१९८१), 'अयोनिजा ' (१९८४) इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. कादंबरी लेखनानंतर ते ललित लेखनाकडे वळले . त्यांचा 'सय' हा ललितलेख संग्रह प्रसिध्द आहे.

वि. शं. पारगांवकर यांच्या एकूण साहित्यावर अनेक लेखकांचा संस्कार झालेला दिसतो.यामध्ये बा. सी. मर्ढेकर, वा. म. जोशी, प्रभाकर पाध्ये, टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, गॉर्की, शेक्सपिअर, एच. ई. बेट्स, मॉम , चेकॉव्ह, डी. एच. लारैन्स इत्यादी साहित्यिकांच्या साहित्यासोबत पारगांवकरांच्या लेखणीला आकार आला. पारगांवकरांचे एकूण व्यक्तिमत्व पाहून प्रा. गं. भा. निरंतर यांनी त्यांना सुप्रसिध्द

कथाकार दि. चा. मोकाशी यांच्याकडे पाठविले. मोकाशींची मैत्री साहित्य प्रवासात त्यांना अत्यंत मोलाची ठरली.

आज अनेक लेखकांना अनेक लेबलं लावली जातात. उदा. दलित, ग्रामीण, सदाशिव पेठी, प्रादेशिक इत्यादी ; पण पारगांवकरांबद्दल वरील एकही लेबल लावले जात नाही. त्यांचे एकूण लेखन जीवनानुभवाच्या विविध आविष्कारातून फुलले. त्यातूनच त्यांची सर्वस्पर्शी कथा, कादंबरी उभी राहिलेली दिसते. त्यांच्या नागरी जीवनावरच्या कथा, कादंबऱ्या कलानिष्ठ भूमिकेतून साकार झाल्या आहेत. तसेच त्यांचे सारे लेखन आहे. याचा प्रत्यय ' रवळे ', 'माळावरचा आंबा ', 'भजन ' इत्यादी कथांतून पाहावयास मिळतो. पारगांवकरांचे जीवनाबद्दलचे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात. ----- " अस्सल अनुभव जीवन जगण्यातून होतो. आणि अशा कलेच्या समीक्षेची मोजपट्टीही वेगळी ; परंतु समजूत किती भोंगळ आणि दिशाभूल करणारी आहे. याची नव्याने उदयास आलेल्या ग्रामीण व दलित लेखकांना जाणीव नाही. हे दुर्दैव ! "[४]

त्यांच्या अनुभवात सर्वस्पर्शी विविधता जशी आहे तशी मुक्तताही आहे. सूक्ष्म, तरल, अनुभवांना, त्यातील भावभावनांना कलाविष्कारात ते गुंफतात. त्यामुळेच त्यांची कथा, कादंबरी शहरी जीवनातून साकार झालेली असो अथवा ग्राम जीवनातून, त्यातून सतत समाजातील व्यथांना कलारूप दिल्याचा अनुभव वाचकांना येतो.

'ललाट ' (१९६२) :- ही वि. शं. पारगावकरांची पहिलीच कादंबरी. या कादंबरीमध्ये ग्रामीण परिसर व तेथील दारिद्रयाने पिचलेल्या लोकांची दुःखे मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या, नोकरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या ब्राह्मण कुटुंबाची संसार कथा चित्रित करणारी ही कादंबरी आहे. दारिद्रयाने पिचलेल्या नानांची आयुष्यभर कशी ससेहोलपट होते याचे हुबेहूब चित्रण पारगावकर करताना दिसतात. नाना व भाऊ यांच्या संसाराची चित्र-विचित्र कथा हा कादंबरीचा विषय आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये नानी, भाऊ, त्यांची मुले- रामा, शांतु, सुमी, सुन- मीरा ही रामाची बायको, माई ही नानींची मैत्रीण, सीता- नानांची बहीण व माधवराव हा नानीचा मेहुणा, नानीच्या माहेरचा नाना सुनार इत्यादी पात्रे रंगविली आहेत.

ही कादंबरी बीड जिल्हा व त्या परिसरातील पिंपळगाव, पांगरी, वडगाव, पारनेर इत्यादी खेड्यांच्या परिसरात घडते. नानी व भाऊ यांचे जीवनानुभव चित्रित करताना पारगावकरांनी नानींची सुखी जीवनाची अपेक्षा व अखेरीस झालेला तिचा अपेक्षाभंग हेच सूत्र या कादंबरीत पकडले आहे. संसारामध्ये सुख असणे ही प्रत्येक व्यक्तीची अपेक्षा असते. पण ती अपेक्षा पूर्ण होत नाही. तिच्या वाट्याला दुःखच येते. अशा दुर्दैवी नानीचे आयुष्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न पारगावकरांनी चांगल्या प्रकारे केला आहे.

' निगुडा ' (१९६२) ही पारगावकरांची दुसरी कादंबरी. ही बहुचर्चित प्रयोगशील कादंबरी आहे. आजच्या विसाव्या शतकातील प्रगत मानवाच्या जीवनातील शौर्य, संरक्षण, संघटना, मातृत्व, मित्रप्रेम, परावलंबन, सौंदर्य यांच्या आविष्कारांचे प्राथमिक ठसे हजारो वर्षापूर्वीच्या माणसांच्या जीवनामध्ये कसे दिसत असतील हे शोधण्याचा प्रयत्न पारगावकरांनी त्या कादंबरीव्दारे केला आहे. एकूण कादंबरी अद्भुत कल्पनेवर आधारलेली आहे. मानवी जीवनाच्या नैसर्गिक अवस्थांचे चित्रण ' निगुडा ' मध्ये आले आहे. निसर्गातील अनेक प्राणी आवाज काढीत असतात. अशा शांत वातावरणामध्ये त्यांच्या आवाजाचे भय या लोकांना वाटत असे. नदीच्या परिसरात असणाऱ्या झोपड्या बांधून रानटी माणसे पोट भरण्यासाठी व जीव जगविण्यासाठी पराकाष्ठा करून राहत होती. अशाच एका वस्तीतील जीवनानुभव 'निगुडा' मध्ये आहे.

' वैशाख्यातील वावटळ ' (१९६३) ही ' निगुडा' नंतरची पारगावकरांची तिसरी यशस्वी कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये तालखेड गावातील शेतकरी कुटुंबातील वातावरण त्यांनी मांडलेले आहे. यात बापू, बापूची पत्नी- पार्वती, जानकी ही बापूची मुलगी, विश्वनाथ- बापूंच्या सोलापूर मधील वहिनीचा- नानीचा मुलगा, भाऊ आणि शांता वहिनी, बापूंचे शेजारी, वामन- जानकीचा पती इत्यादी प्रमुख पात्रे आहेत. नुकत्याच ऐन तारुण्यात प्रवेश करणाऱ्या व विवाहित होणाऱ्या जानकीच्या भावभावनांचे मनोरम चित्रण पारगावकरांनी ह्या कादंबरीद्वारे केले आहे.

'कालचक्र' (१९६७) ही पारगांवकरांची आणखी एक आगळीवेगळी कादंबरी आहे. या कादंबरीत केवळ मराठवाड्यातील जीवनाचे चित्र नाही, तर मराठवाड्यातील तीन पिढ्यांमध्ये घडत गेलेल्या स्थित्यंतराचे चलत्चित्र आहे. ही कादंबरी राजेकर घराण्यातील व्यक्तींमध्ये जेवढी रमते तेवढीच ती मराठवाड्यातील एका शहरामध्ये होत गेलेल्या बदलांमध्येही स्वारस्य घेते. बीडच्या परिसरांत कादंबरीचे कथानक घडते. एका प्रतिष्ठित राजेकर घराण्याची कुटुंबकथा सांगणारी पारंपारिक साचाची ही कादंबरी आहे. जवळजवळ ४० वर्षांचा राजेकरांचा इतिहास ती सांगते. बीडचे प्रसिध्द तहसिलदार भाऊसाहेब, त्यांचा मुलगा दादासाहेब व दादासाहेबांचा पुतण्या माधव व राजेकरांच्या घराण्यातील तीन पिढ्यांचे अंतरंग त्यांचा घरंदाजपणा, विशिष्ट चाकोरीतील जीवन व बदलते जीवन चित्रित करून काळाच्या ओघातील घराण्याचे बदल दाखविले आहेत. कादंबरीमध्ये भाऊसाहेब, भाऊसाहेबांची पत्नी गोपिकाबाई, दादासाहेब, तात्या ही भाऊसाहेबांची मुले, वारुणा व आनंदी या दोन सुना, नानू भाऊसाहेबांचा पुतण्या, आक्कासाहेबांची विधवा मुलगी, माधव व त्यांची पत्नी सुधा पारगावकरांनी रेखाटलेली आहेत. त्यांची ही कादंबरी अतिशय गाजलेली आहे.

प्रा. वि. के. बेडेकर पारगावकरांच्या कादंबरीबाबत लिहितात, " कालचक्र " या कादंबरीचा शेवट जेवढा महत्वाचा आहे, तेवढाच तो परिणामकारकही आहे. जीवनामधील सत्याच्या शोधाची ओढ हा कादंबरीच्या शेवटाचा गाभा आहे. सरळ

सरळ नेहमीच्या प्रसंगामधूनच या जीवनाचे चित्रण लेखकाने केलेले असले ; तरी त्या वरवरच्या जीवनाच्या फटीमधून आंतरजीवनाचा वेध घेण्याचा अत्यंत यशस्वी प्रयत्न येथे केलेला असल्याचे प्रत्ययाला येते. 'कालचक्र ' याकादंबरीबाबत दि. के. बेडेकरांनी इंडियन रायटिंग्ज टुडे " या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकातील (१९७०) वरील अभिप्रायात ही कादंबरी अस्वस्थ करणारी आहे, अशी प्रशंसा करताना वर्ग- मीमांसेच्या सिध्दांताशी तिची तुलना केलेली आहे. बेडेकर हे मार्क्सवादी तसेच तत्त्वचिंतक तरीही मार्क्सवादाच्या दृष्टिकोनातून ते या कादंबरीचे परीक्षण करताना जे निकष वापरतात, त्यामधून देखील त्यांना या कादंबरीकडे कलासौंदर्य म्हणून पाहावे लागलेले आहे. हा या कादंबरीचा एक कलाकृती म्हणून विजयच मानला पाहिजे. तसेच प्रभाकर पाध्ये यांनी (केसरी- १०-५-७०) 'कालचक्र ' या कादंबरीवर प्रदीर्घ विवेचन केले आहे.

'ढेंगा वेडा झाला ' (१९७०) याकादंबरीत एका कुटुंबातील माणसे कसल्या ना कसल्या तरी विकृतीने, वेडाने पछाडलेले जीवन जगत आहेत. त्या घरात आलेली सून फक्त 'नॉर्मल ' आहे. अनेक दिशांनी येऊन तिच्या जीवनाशी भिडणारे या विकृत जीवनाचे धक्के तिच्या मनात निरनिराळे ताण निर्माण करतात. आणि ज्या आधारावर ती हे सारे ताण सोसते तो तिचा नवरा देखील विकृतीच्या जगात खेचला जातो. अशा एका वेगळ्याच पातळीवरील जीवनाच्या अनुभवावर आधारलेली ही कादंबरी आहे. ही कादंबरी शहरी जीवनावर आधारलेली आहे. हैद्राबाद शहरात

वास्तव्य करणारे डॉ. माधव आणि त्यांची पत्नी मालतीबाई यांच्या जीवनातील चमत्कारिक अनुभव कादंबरीत चित्रित केले आहेत. मालतीबाईंच्या मनात ' आपल्यावर डॉ. माधवांचे खरे प्रेम नाही ' हा संशय कायम आहे. संशयाने पछाडलेल्या मालतीबाईंच्या विकृतीचा बळी डॉ. माधव होतात. ते सर्व प्रकारचे मानसिक स्वास्थ्य आणि वैवाहिक जीवनातील सुख हरवून बसतात. वेळोवेळी स्वतःला व मालतीबाईंना सावरण्याचा प्रयत्न करताना दिसतात. डॉ. माधवांचे कौटुंबिक सुख हरवले आहे. अशा या मनोविकृतीतून निर्माण झालेल्या आंतरिक संघर्षाचे चित्रण ' शेवगा वेडा झाला ' या कादंबरीत पारगावकरांनी रंगविले आहे.

' ललिता ' (१९६९) या कादंबरीत ललिता, ललिताची आई - नानीआत्या, छगन - ललिताचा भाऊ, अनंता - ललिताचा मामा - सदूभाऊ यांचा मुलगा, काशीनाथ कुलकर्णी - ललिताचा पती इत्यादी पात्रांच्या माध्यमातून कादंबरी रेखाटली आहे. कादंबरीमध्ये बीड जिल्हयातील पोगरी गावातील एका ब्राम्हण कुटुंबातील दुर्दैवी ललिताची व्यथा कादंबरीद्वारे मांडली आहे. लहानवयातच वडील वारल्यामुळे सामाजिक संकेतानुसार तिला तीन वर्षे लग्न करता येणार नाही. म्हणून ललिताच्या मामांनी जुन्या नात्यातील काशिनाथ कुलकर्णी यांच्याशी तिचे लग्न करुन दिले. काशिनाथची इच्छा नसताना काशिनाथच्या वडिलांनी हे लग्न तातडतोब पार पाडले. काशिनाथ सुरुवातीपासून ललिताबरोबर फटकून वागतो. तो तिचा पत्नी म्हणून स्वीकार करीत नाही. उलट सकाळीच चहा न घेता आपल्या गावी निघून जातो.

त्याच्यबरोबर काशिनाथची आई, वडील तेही निघतात. सदूभाऊ समजावण्याचा खूप प्रयत्न करतो पण त्याला यश येत नाही. अनंता ललिताचे दुःख पाहून खूप दुःखी होतो. अनंताच्या मनाचा मोठेपणा लेखकाने येथे स्पष्ट केला आहे. संपूर्ण कादंबरीत जवळ-जवळ २५-३० वर्षांचा कालखंड चित्रित केला आहे.

'अंतरिता' (१९७२) ही ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये बीड जिल्ह्यातील तावरगांवच्या पार्श्वभूमीवर तात्यांच्या संसाराचे चित्र रेखाटले आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये दादा, तात्या आणि नाना या तीन भावांचा एकत्रित संसार पारगांवकरांनी चित्रित केला आहे. अस्सल ग्रामीण जीवन रेखाटणारी ही कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये दादा, तात्या, नाना, गावचे पाटील, बाळा भाऊ सोनार, मथुरा, कृष्णा साहेबराव पाटील इत्यादी पात्रांच्या माध्मातून 'अंतरिता' ही कादंबरी साकार होते. खेडयामध्ये फक्त बहुजनसमाजच नसतो, तर एका विशिष्ट जीवनपध्दतीत बंदिस्त होऊन पडलेल्या या जीवनाच्या घटकांमध्ये ब्राम्हण, मराठा, महार, मांग, चांभार, शिंपी, मुसलमान, तांबोळी या सर्वांचाच समावेश असतो. आणि त्या संबंध खेडयामधील या सर्व घटकांमध्ये आर्थिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक तसेच प्रतिष्ठाविषयक अनेक ताणतणाव निर्माण झालेले असतात. अशा एका खेडयातील समग्र जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न पारगावकरांनी केलेला आहे.

डॉ. आनंद यादव यांना 'अंतरिता' ही कादंबरी मनापासून आवडली तर होतीच ; पण ही कादंबरी वाचून झाल्यावर आपले ------- मन उदास झाले.

वाचकाची मानसिक अवस्था इतक्या गांभीर्याच्या पातळीवर नेणे, त्याची सर्वसाधारण घडीच उलटीपालटी करणे हे चांगल्या कलाकृतीचे परिणामाच्या संदर्भातील एक लक्षण मला वाटते. त्यांचा अनुभव ' अंतरिता ' वाचताना आला. अशा शब्दांत या कादंबरीचे मूल्यमापनही यादवांनी केलेले आहे.

' अपरंपार ' (१९७०) या कादंबरीमध्ये वैवाहिक जीवनातील सुख हरवून बसलेल्या श्रीनिवास-नंदा, आणि इंद्रनाथ-कुसुम यांच्या व्यथेचे चित्रण केले आहे. बीडच्या शहरी वातावरणात वावरणाऱ्या श्रीनिवासच्या लग्नसंबंधातून कादंबरीची सुरुवात होते. वि. शं. पारगावकरांनी स्त्री जीवनातील अनादी दुःखांची जाणीव या कादंबरीव्दारे करुन दिली आहे.

' अयोनिजा ' (१९८४) या कादंबरीत द्रौपदी ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. द्रौपदी म्हणजे अयोनिजा की जिचा जन्म मानवी योनीतून झालेला नाही. म्हणजेच ती एका अर्थाने स्वयंसिध्द आहे. श्रीकृष्ण आणि द्रौपदी या महाभारतातील दोन प्रमुख व्यक्तींच्या जीवनाला केंद्रबिंदू कल्पून पारगावकर यांनी ' अयोनिजा ' कादंबरी निर्माण केली आहे.

' संध्यामेघ ' (१९६६), ' जुनागड ते काश्मीर ' (१९६६), ' जगापुढील प्रश्नचिन्ह' (१९६७), ' पूर्वदर्शन ' इत्यादी राजकीय पुस्तकांचेही लेखन वि. शं. पारगावकरांनी केले आहे. त्यांचे बहुतांश लेखन ' साप्ताहिक माणूस ', 'साप्ताहिक सोबत ' इत्यादींतून प्रसिध्द झालेले आहे.

वि. शं. पारगावकरांचे बालपण ग्रामीण भागात गेल्याने त्यांचे बहुतांश साहित्य ग्रामीण भागाचे वर्णन करते. उदा. देऊळ, चावडी, शाळा, गढी, बुरूज, मशीद, बामणाचा वाडा, भजन इत्यादी. त्यांनी ललित लेखन ' सय ' (१९८०) मध्ये प्रसिध्द झालेल्या ललित निबंधाच्या पुस्तकातून केलेले आहे. त्यांची व्यक्तिचित्रणे लोकप्रिय झाली आहेत.

वि. शं. पारगावकर यांनी १९६२ ते १९६४ या काळात गाजलेल्या 'नवे जग ' ह्या मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले. या मासिकामधून विविध अभ्यासपूर्ण विषय हाताळण्याची प्रथम सुरुवात त्यांनी केली.

पारगावकरांचे आवडीचे विषय त्यांच्या कलाकृतींमधून आणि वैचारिक व समीक्षणात्मक लेखनामधून आलेले आहेत. परंतु त्यांच्या वाचनाचे आणि चिंतनाचे खास विषय राजकारण, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, जगाचा राजकीय भूगोल, जुन्या संस्कृतीवरील ग्रंथ, वाङ्मयीन समीक्षा, सौंदर्यशास्त्र व ललित वाङ्मय आहेत. टेनिस आणि कॅरम हेही त्यांचे खास आवडीचे खेळ. ' क्रिकेट ' या खेळाविषयी त्यांना कुतूहल होते. परंतु त्यामधील आकडेवारीचा त्यांना खूप कंटाळा येई. भारतीय संगीताविषयी त्यांना फार आवड होती. मराठीमधील भावगीते, नाट्यगीते, भावकविता इत्यादींकडे त्यांची सतत ओढ असे.

१९६२ पासून अल्सरसारख्या त्रासदायक आजाराने ते ग्रस्त होते. पण आजाराशी हसतमुखाने झगडत त्यांनी लेखन केले. १९८२ पासून प्रकृती अधिकच

नाजूक झाली. पडल्या पडल्या वाचन एवढेच शक्य होऊ लागले. अशा या लेखकाचा मृत्यू कॅन्सरने ४ जुलै १९८९ रोजी झाला.

या प्रकरणात आपण वि. शं. पारगावकर यांचा जन्म, बालपण, बालपणाचे संस्कार, शिक्षण, व्यवसाय, व्यासंग, लेखन या मुद्यांच्या आधारे विवेचन केलेले आहे.

पुढच्या प्रकरणात 'अपरंपार' या कादंबरीचा विचार करण्याचे योजिले आहे.

# प्रकरण दुसरे

## संदर्भ


१. (संपा.) द.वि. फुंडे, 'उजळती लकेर,' पुणे, १९७० पृष्ठ ६

२. तत्रैव, पृष्ठ ६

३. तत्रैव, पृष्ठ ५

४. दादा गोरे 'दैनिक लोकमत,' शनिवार दि. ४ जुलै १९९२ औरंगाबाद पृ. ५

५. द. वि. फुंडे, 'उजळती लकेर' पुणे पृष्ठ ९ वरून उद्धृत

६. तत्रैव, पृष्ठ ९